'अर्थक्रांतीची देशव्यापी समर्पण यात्रेसाठी हाक!'

मुंबई, दिनांक १२ जून

ढासळलेली अर्थव्यवस्था आणि भ्रष्टाचार विरोधातील नाराजीचे वातावरण असतानाच व्यापक जनजागृतीसाठी देशव्यापी समर्पण यात्रा सुरू करण्याची घोषणा आज (मंगळवारी) मुंबईत 'अर्थक्रांती प्रतिष्ठान' या स्वयंसेवी संघटनेने केली. देशाच्या अर्थव्यवस्थेत क्रांतीकारक दुरुस्ती सुचविणाऱ्या 'अर्थक्रांती प्रतिष्ठान'ने एका पत्रकार परिषदेत समर्पण यात्रेमागील भूमिका मांडली. १५ जुलैपासून महाराष्ट्रातील औरंगाबाद येथून ही विशाल यात्रा सुरू होणार आहे.

अर्थक्रांती हे कोठलेही हिंसक आंदोलन नाही, तसेच हे आंदोलन कोठल्याही पक्ष वा व्यक्तिविरोधातही नाही. ही एक अर्थव्यवस्थेतील दुरुस्ती आहे. महागाई, भ्रष्टाचार, रूपयाचे अवमूल्यन, चलनवाढ अशा अनेक जुनाट समस्यांवर अर्थक्रांतीचा प्रस्ताव हा एकमेव उपाय आहे असे स्पष्ट करत 'अर्थक्रांती प्रतिष्ठान'चे अध्यक्ष अनिल बोकिल यांनी अर्थक्रांतीची संकल्पना स्पष्ट करून सांगितली. कस्टम ड्युटी वगळता प्रचलित सर्व कर रद्द करावेत, बॅंकांमधील व्यवहारांवर बॅंक व्यवहारकर (उदा २ टक्के) लागू करावा, कालबद्ध कार्यक्रमानिशी शंभर रुपयांवरील सर्व नोटा चलनातून रद्द कराव्यात, रोखेतील व्यवहार करबाह्य असावेत तसेच दोन हजार रुपयांवरील रोख व्यवहारांना कायदेशीर संरक्षण देऊ नये अशी अर्थक्रांतीची पाच कलमे आहेत.

राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्यासह अनेक महनीय व्यक्तींसमोर अर्थक्रांतीची संकल्पना ठेवण्यात आली असून, आता वेळ आहे ती कृतीची असे प्रतिष्ठानतर्फे सांगण्यात आले.

औरंगाबादमधून १५ जुलै रोजी निघणारी समर्पण यात्रा चार मार्गांवरून चार गुरुतुल्य मार्गदर्शिंकांकडे जाईल. थोर समाजसेवक अण्णा हजारे (राळेगणसिद्धी), श्री. श्री. रविशंकर (बेंगळुरू), बाबा रामदेव (हरद्वार) आणि डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम (दिल्ली) अशा मार्गदर्शिंकांकडे अर्थक्रांतीचे कार्यकर्ते जातील. या चौघा गुरुतुल्य मार्गदर्शकांनी एक व्यापक प्रतिनिधी मंडळ निवडावे आणि जनतेचा जाहिरनामा तयार करावा. जनलोकपाल विधेयक, अर्थक्रांती विधेयक ही विधेयके या जाहिरनाम्याचाच भाग असतील अशी एकंदरीत आंदोलनाची व्यूहरचना 'अर्थक्रांती प्रतिष्ठान'चे विश्वस्त अनिल शिंदे यांनी सांगितली.

देशभरातून हजारो कार्यकर्ते आंदोलनाच्या तयारीत असून शेकडो तरुणांनी समर्पण यात्रेसाठी आपली नावे एव्हाना नोंदवली आहेत. मोठ्या संख्येने त्यांनी या यात्रेत सहभाग नोंदवुन देशाच्या पुर्नउभारणेच्या कामी हातभार लावावा असे आवाहन प्रवक्ते श्री दिपक करंजीकर यांनी केले.

१६ ऑगस्ट रोजी राजधानी दिल्ली येथे या चारही गुरुतुल्य मार्गदर्शकांना एका व्यासपीठावर आणण्याचा आमचा प्रयत्न राहील असे ते म्हणाले.